**नियमित दिवाणी दावा**

**क्र.१७०००५७/२०१०**

मधुकर वि. लता

**नि.पी–६२/पी.डब्लयू.२**

(वारंवार पुकारा करुन ही प्रतिवादी व विधीज्ञ गैरहजर. साक्षीदार सकाळ पासून हजर आहे. म्हणून त्यांचा सरतपास नोंदविण्यात येत आहे.)

**<u>वादीतर्फे सा.क्र.२</u>**

**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.एच.पाटील यांच्या मार्फत सरतपास शपथेवर सुरुः–</u>**

नाव – ज्योती मनोज राऊत, वय – ५५ वर्षे,

व्यवसाय – ग्रामपंचायत अधिकारी, मुरबे, रा. पालघर

१. कोर्टातून आलेले समन्स प्रमाणे मी साक्षीदार म्हणून आले आहे. साक्षीदार म्हणून येण्यासाठी मला आदेश मिळाले आहे. प्रोसिडींग बुक व बांधकाम परवाना मी दाखल केला आहे. आता मला नि. ५२ वरील कागदपत्र दाखवण्यात आले. सदर साक्षांकित प्रती मी दाखल केलेल्या आहेत. सदरच्या प्रती मी आमच्या ग्रामपंचायत कार्यालयातून दाखल केल्या आहेत. कार्यालयाच्या अभिलेखावरून असलेल्या कागदपत्रांवरून सदरच्या प्रती तयार केलेल्या आहेत.

२. (निशाणी ५२/१ सोबतचे २ कागदपत्र साक्षीदार यांना दाखवण्यात आले.) त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का व माझी सही आहे. मजकूर बरोबर आहे. (सही शिक्याची नक्कल असल्याने त्यास भारतीय पुरावा कायदा कलम ७४,७६,७७,७८,७९ प्रमाणे **<u>नि.पी–६३/पी.डब्लयू.२ व नि.पी–६४/पी.डब्लयू.२</u>** देण्यात येत आहे.) (निशाणी ५२/२ सोबतचे ४ कागदपत्र साक्षीदार यांना दाखवण्यात आले.) त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का व माझी सही आहे. मजकूर बरोबर आहे. (सही शिक्याची नक्कल असल्याने त्यास भारतीय पुरावा कायदा कलम ७४,७६,७७,७८,७९ प्रमाणे **<u>नि.पी–६५/पी.डब्लयू.२, नि.पी–६६/पी.डब्लयू.२, नि.पी–६७/पी.डब्लयू.२ व नि.पी–६८/पी.डब्लयू.२</u>** देण्यात येत आहे.)

३. (प्रतिवादीतर्फे वकील श्री. के.व्ही.गायकवाड हजर.) (निशाणी ५२/३ सोबतचे कागदपत्र, त्यामध्ये ३ पाने असून प्रत्येक पानावर सही शिक्के आहेत व साक्षीदार यांना दाखवण्यात आले.) ठराव आहे. त्यावर आमच्या

कार्यालयाचा शिक्का व माझी सही आहे. मजकूर बरोबर आहे. (सही शिक्याची नक्कल असल्याने व ३ वेगळे पान असून ठराविक मजकूराची प्रत असल्याने, त्यास भारतीय पुरावा कायदा कलम ७४,७६,७७,७८,७९ प्रमाणे **नि.पी–६९/पी.डब्लयू.२, नि.पी–७०/पी.डब्लयू.२, नि.पी–७१/पी.डब्लयू.२** देण्यात येत आहे.)

**सरतपास पूर्ण.**

**प्रतिवादीतर्फे वकील श्री. के.व्ही. गायकवाड यांच्या विनंतीनुसार शेवटची संधी म्हणून उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

(श्रीमती पी.एस.जी.चाळकर)

दिनांक : १६/०२/२०२६ २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

ठिकाण: पालघर पालघर.

**नियमित दिवाणी दावा क्र.१७०००५७/२०१०**

मधुकर वि. लता

**नि.पी–६२/पी.डब्लयू.२**

**<u>वादीतर्फे सा.क्र.२ – श्रीम. ज्योती मनोज राऊत</u>**

**प्रतिवादीतर्फे वकील श्री. के.व्ही. गायकवाड यांच्यामार्फत शपथेवर उलटतपास –**

४. मी सप्टेंबर २०२१ ला ग्रामपंचायत मुरबे येथील ग्रामपंचायत अधिकारी म्हणून रुजू झाले. आजही तिकडेच आहे. मी मूळ कागदपत्रे सोबत आणले आहेत. (त्यांच्याकडील मूळ कागदपत्र पाहून साक्षीदार उत्तर देत आहे) प्रतिवादी क्र. १ लता यांनी घर दुरुस्ती साठी ग्रामपंचायत मुरबे येथे २६/१२/२००८ रोजीचा व प्रतिवादी क्र. २ साधना यांनी ११/१२/२००८ रोजीचा अर्ज केलेला आहे. २१/१/२००९ ला प्रतिवादी क्र. १ ला व २०/०१/२००९ ला प्रतिवादी क्र. २ ला मंजूरी देण्यात आली होती. मासिक सभा २६/१२/२००८ ची होती व त्या तारखेचा ठराव आहे. ठरावाची मूळ प्रत मी सोबत आणली आहे. प्रतिवादींनी घर दुरूस्ती साठी दाखल केलेला अर्ज या कालावधीपासून मासिक सभा, ग्रामपंचायत ठराव झाल्यानंतर, प्रतिवादींना परवानगी मिळेपर्यंत, वादींने ग्रामपंचायतकडे तक्रारी अर्ज केला होता का मला सांगता येणार नाही. आमच्या कडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांमध्ये, ग्रामपंचायत कडे तक्रार दिली याबददलचा कागदपत्र नाही. साक्षीदार स्वतहून सांगतात की, फक्त तंटामुक्तीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, अभिलेखाप्रमाणे वादीने आजतागायत प्रतिवादी विरुदध तक्रारी अर्ज दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तंटामुक्ती अधिकारी हे लोक प्रतिनिधी असून, आम्ही शासनाचे अधिकारी आहोत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या सभेमध्ये ठराव झाला तिथे मी हजर नव्हते. साक्षीदार स्वतहुन सांगतात की, तो माझा कार्यकाळ नव्हता.

५. हे म्हणणे खरे आहे की, तंटामुक्तीच्या सभेसाठी लोकप्रतिनिधी सोबत शासकीय अधिकारी देखील हजर लागतात. हे म्हणणे खरे आहे की, हे तंटामुक्ती सभेमध्ये लोकप्रतिनिधी सोबत शासकीय अधिकारींची देखील सही घेतली जाते. आता मला नि.पी–६४/पी.डब्लयू.२ वरील ठराव दाखवण्यात आला. त्यामध्ये शासकीय अधिकारी म्हणून कोणीही हजर असल्याबददल नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत अखत्यारित जे रस्ते असतात त्यांची

नोंद असते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत अखत्यारित असलेले रस्त्यांची देखभाल ग्रामपंचायत करते व पी.डब्लयू.डी. कडे दिलेल्या रस्त्यांची देखभाल ते करतात. प्रतिवादी नं १ व २ यांच्या घराकडून ६ फूटाचा रस्ता होता व वादीच्या वापरासाठी प्रतिवादींनी अडवला याबददल तक्रार आमच्याकडील अभिलेखावर नाही. रस्ता अडवल्या बददल ग्रामपंचायतनी प्रतिवादींना नोटीस दिली होती असा कुठलाही कागदपत्र आमच्या अभिलेखावर नाही. प्रतिवादी नं १ व २ च्या घरामधून रस्ता होता या बददल कुठलाही पुरावा आमच्या अभिलेखावर नाही. प्रतिवादी नं १ व २ च्या घरामधून रस्ता ग्रामपंचायतकडे वर्ग केलेला आहे याबददल कुठलीही नोंद आमच्या अभिलेखावर नाही. साक्षीदार स्वतहुन सांगतात की, मुख्य रस्त्याची नोंद होते, पायवाटची नोंद होत नाही, ती पायवाट असेल तर त्याची नोंद नाही. नि.पी–६४/पी.डब्लयू.२ वरील ठराव हा तंटामुक्ती सभेत देत असतांना, शासकीय अधिकारी म्हणून कोणीही हजर नसतांना, चुकीच्या पदधतीने वादीच्या दबावामुळे चुकीचा ठराव देण्यात आला, याबददल मला सांगता येणार नाही, तो माझा कार्यकाळ नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, तो माझा कार्यकाळ नसल्याने मला व्यक्तीश माहिती नाही. साक्षीदार स्वतहुन सांगतात की, मी अभिलेखावरून सांगितले आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Digitally signed by PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Date: 2026.02.17 18:12:29 +0530

(श्रीमती पी.एस.जी.चाळकर)

दिनांक : १७/०२/२०२६ — २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

ठिकाण: पालघर — पालघर.